**CNR No. MHSCA2-000586-2018**

**लघुवाद न्यायालय, मुंबई**

**न्यायनिर्णय**

पीठासीन अधिकारी - आर. एस. रोटे
न्यायाधीश, न्यायालय कक्ष क्र. २१
दिनांक : ११.०१.२०१९
निशाणी ९

समरी दावा क्र. १२४/२०१८
वादी तर्फे श्रीमती पि. एच. गोस्वामी
प्रतिवादी विरुध्द दावा एकतर्फी

**केवलकुमार राजमल जैन वि. १. पंकज सोमचंद वाघेला**
**२. जीवन एम. विजूंडा**

दाव्याचे समन्स प्राप्त होऊनही प्रतिवादी हजर न झाल्याने दावा त्याचेविरुध्द एकतर्फी चालविण्यात आला. वादीने प्रकरणात दाखल केलेली कागदपत्रे म्हणजे लायसन्स, (नि. ८/१), वचन चिठ्ठी, (नि. ८/२), फॉर्म क्र ८ नि. (८/३) अकाउंट पुस्तकाचा उतारा, (८/५) इत्यादी त्याची बाजू मांडण्याच्या पुष्ठयर्थ पुरेशी दिसून येतात. यावरुन प्रतिवादी वादीस रक्कम रु. १०,०००/- देणे लागतात असे शाबित होते.

प्रतिवादी प्रकरणात हजर न झाल्याने वादीस दाव्याचा खर्च तसेच कलम ३४ दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार दावा दाखल तारखेपासून ते हुकूमनामा रक्कम वसूल होईपर्यंत मुळ रकमेवर द. सा. द. शे. रु.६ टक्के दराने व्याज मंजूर करणे न्यायोचित होईल असे वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश -

आ दे श

१. दावा खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादींनी संयुक्तपणे व वैयक्तिकरित्या वादीस एकुण रु. १०,०००/- (दहा हजार रुपये फक्त) एवढी रक्कम द्यावी व रु. १०,०००/- (दहा हजार रुपये फक्त) च्या रकमेवर दावा दाखल तारखेपासून ते प्रत्यक्ष रक्कम वसूल होईपावेतो द. सा. द. शे. रु. ६ टक्के दराने व्याज द्यावे.

३. वादीस २/३ कोर्ट फी परत करावी.

४. त्याप्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

मुंबई
दिनांक - ११.०१.२०१९

( आर. एस. रोटे )
न्यायाधीश, लघुवाद न्यायालय कक्ष क्र. २१, मुंबई.